


# दैनिक आकर्षण

**संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे**




वर्ष ४ । अंक ९४ । बुधवार १ जानेवारी २०२५ । पाने ४ । मूल्य ₹ २

https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने

## महानगरपालिकेची 'पे अँड पार्किंग' योजनेसंदर्भात मनपा उपयुक्त यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मनपाने शहरातील विविध ठिकाणी पे अँड पार्क योजनेची अंबलबजावनीची घोषना केली आहे. यामध्ये शहराच्या मुख्य मध्यवर्ती बाजारपेठेसह उपनगरातील प्रमुख रहदारीचे रस्ते, जागा, यांचा समावेश आहे. प्रत्येक्षात शहरातील नागरीक हा महागाईने त्रस्त आहे व नगरकरांनी कोट्यावधीचा कर भरुन देखील कोणतीही मुलभूत सुविधा नागरिकांना मनपा व्यवस्तीत देत नाही. असे असताना नविन योजनेची अंबलबजावणी करुन नगरकरांना लुटण्याचा घाट मनपा घालत आहे. मनपाने ही योजना त्वरीत मागे घ्यावी, व मनपाकडे स्वमालकीचे भूखंड बाजारपेठेलगत असलेल्या जागेत वाहणतळ निमार्ण करुन नगरकरांना सुविधा उपलब्ध करुन द्यावी. अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाच्या वतीने मनपा उपायुक्त यांना देऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम ,माजी महापौर भगवान फुलसोंदर ,माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,युवा सेनेचे विक्रम राठोड ,दत्ता जाधव , संतोष गेनपा ,दत्ता कावरे , रावजी नागरे ,योगीराज गाडे ,प्रशांत गायकवाड़ ,रवींद्र वाकळे ,सचिन शिंदे ,विशाल गायकवाड ,आदी उपस्थित होते नागरीकांचा महानगरपालिकेकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलावा व ही योजना त्वरीत रद्द करावी. अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल.



नववर्षानिमित्त ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे भाविकांनी सकाळपासून दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. (छाया – राजू खरपुडे, नगर)

## नगर अर्बन बँकेतील 'ते'लॉकर्स उघडण्याचा बँक प्रशासनाचा निर्णय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नगर अर्बन बँकेच्या विविध शाखांमधील लॉकर्स बाबत वारंवार जाहीर निवेदने दिल्यानंतरही तसेच संबंधित लॉकर्सधारकांना नोटीसा पाठवून संपर्क करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही भाडे भरण्यासाठी संबंधित लॉकरधारक अथवा त्यांचे कायदेशीर वारस हे पुढे न आल्याने अखेर ते १३२ लॉकर्स कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पंचांसमक्ष उघडण्याचा निर्णय बँक प्रशासनाने घेतला असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

अनेक वर्षांपासून बंद असलेल्या विविध शाखांमधील लॉकर्स बाबत बँक प्रशासनाने संबंधितांना उपलब्ध असलेल्या पत्त्यांवर नोटीसा पाठवून तसेच उपलब्ध असलेल्या मोबाईल – दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र १३२ लॉकरधारकांनी अद्याप बँक प्रशासनाकडे संपर्क साधलेला नाही. लॉकर भाड्यापोटी मोठी रक्कम संबंधितांकडून बँकेला येणे आहे. त्यामुळे असे लॉकर्स कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पंचांसमक्ष उघडून त्यातील चीज वस्तू / मुद्देमाल सीलबंद करून मुख्य ■ पान ४ वर

## कवाडे यांच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार– सुरेश बनसोडे

**महाराष्ट्र शासनाच्या लघुउद्योग महामंडळाच्या उपाध्यक्षपदी जयदीप कवाडे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या लघुउद्योग मंडळाच्या उपाध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) जयदीप जोगेंद्र कवाडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा नगर शासकीय विश्रामगृह येथे राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे तसेच आमदार संग्राम जगताप मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करताना सामाजिक ■ पान ४ वर



## निवडक

### ऐतिहासिक मार्कंडेय मंदिराच्या जीर्णोद्धारास आजपासून सुरुवात

नगर - पद्मशाली समाजाचे व भाविकांचे श्रद्धास्थान



असलेल्या व १०० वर्षांहून अधिक ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय देवस्थानच्या मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ २०२५ या नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर एक जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी शहर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत, अशी माहिती श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी दिली. गांधी मैदान येथील या ऐतिहासिक मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा अशी सर्व समाजातील नागरिकांची व भाविकांची बऱ्याच वर्षांपासून मागणी होती. त्यानुसार देवस्थान ट्रस्टच्या कमिटीने नवीन वर्षाच्या सुरवातीलाच एक जानेवारी रोजी मंदिराच्या जीर्णोद्धार कामास सुरुवात करण्याचा निर्णय घेत भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष मनोज दुलम यांनी दिली. मंदिराच्या जीर्णोद्धार भूमिपूजनास सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे सरचिटणीस प्रकाश कोटा, खजिनदार अजय म्याना आदींसह ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व अखंड पद्मशाली समाजाच्या वतीने केले आहे.

### आपल्या दिव्यांग मुलाच्या नावाने शिक्षकाने शालेय परिसर नटवले हिरवाईने



अहिल्यानगर- भुईकोट किल्ला येथील हिंदी माध्यमच्या पंडित नेहरू हिंदी विद्यालय परिसर हिरवाईने फुलविण्याचा ध्यास घेतलेले शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी स्वखर्चाने वृक्षारोपण अभियान राबविले. नचिकेत बोडखे या दिव्यांग असलेल्या आपल्या मुलाला शाळेत शिक्षण देता येत नसल्याने, त्याच्या नावाने शाळेत झाडे लावून शाळेत येत असलेल्या इतर मुलांना सावली मिळण्याच्या उद्देशाने बोडखे सातत्याने हा उपक्रम राबवित आहे. शाळेत त्यांनी नुकतेच आपल्या दिव्यांग मुलाच्या नावाने ४१ झाडे लावली. शाळेत राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण अभियानाचे प्रारंभ माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते झाडाची लागवड करुन करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, संस्थेचे सचिव किशोर मुनोत, मुख्याध्यापक सुहास धिवर आदींसह सर्व शालेय शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. अशोक कडूस म्हणाले की, दिव्यांग, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी बाबासाहेब बोडखे यांनी सुरु केलेला उपक्रम समाजाला दिशादर्शक आहे. बोडखे यांना आपल्या दिव्यांग मुलाला शाळेत पाठवता येत नसल्याने ते दरवर्षी त्याच्या वाढदिवसाला गरजू व दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध प्रकारची मदत देत असतात. इतर मुलांमध्ये ते आपले मुले पाहतात. सामाजिक बांधिलकी असलेल्या शिक्षकांची समाजाला गरज असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. बाळासाहेब बुगे म्हणाले की, बोडखे यांचे सामाजिक कार्य फक्त वैचारिक नव्हे, तर कृतीतून उतरलेले आहे. त्यांच्या योगदानाने अनेक विद्यार्थ्यांना आधार मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. जुबेर पठाण यांनी समाजाशी नाळ जोडलेला शिक्षक म्हणून बोडखे यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी शाळेत चालवलेली वृक्षारोपणाची मोहिम दिशादर्शक ठरणार असल्याचे स्पष्ट केले. किशोर मुनोत यांनी बोडखे यांचे कार्य सर्वांसाठी स्फूर्तीदायी आहे. आपल्या मुलाच्या नावाने एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड करणारे बोडखे यांच्या कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची एकप्रकारे आवड निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाडिया पार्क मैदानातील टर्फ विकेट व फ्लड लाईटचे काम मार्गी लागणार - आ.संग्राम जगताप

## जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न । डिफेन्स, एस.के, हुंडेकरी, प्रियदर्शनी क्रिकेट ॲकॅडमीने मिळविले विजेतपद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर -** वाकोडी येथील साईदीप मैदानावर जिल्हास्तरीय बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धा २३ दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाली. प्रत्येक सामना अटीतटीचा व शेवटच्या षटकापर्यंत चालला असून खेळाडूंनी क्रिकेट प्रेमींचे मने जिंकली. या स्पर्धेमध्ये १२ वर्षाखालील वयोगटातील अंतिम सामना डिफेन्स क्रिकेट ॲकॅडमी विरुद्ध हुंडेकरी क्रिकेट ॲकॅडमी यांच्या मध्ये चुरशीचा झाला असून यामध्ये डिफेन्स क्रिकेट अकॅडमी ने विजेते पद मिळविले तसेच १४ वर्ष वयोगटाखाली अंतिम सामना एस.के क्रिकेट अकॅडमी व समर्थ क्रिकेट ॲकॅडमी मध्ये झाला असून एस.के क्रिकेट अकॅडमी ने विजेतेपद मिळविले तसेच १६ वर्ष वयोगटाखालील अंतिम सामना हुंडेकरी क्रिकेट ॲकॅडमी व एस.के क्रिकेट अकॅडमी मध्ये झाला असून हुंडेकरी क्रिकेट ॲकॅडमी ने विजेतेपद मिळविले याचबरोबर १९ वर्षाखालील वयोगटातील अंतिम सामना प्रियदर्शनी क्रिकेट ॲकॅडमी आणि आर.एल क्रिकेट अकॅडमी यांच्यामध्ये झाला असून प्रियदर्शनी क्रिकेट ॲकॅडमी संघाने विजेते पट मिळविले असल्याची माहिती आयोजक कपिल पवार यांनी दिली.

अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी सी.ए अशोक पितळे. गौतम सुवर्ण पाठकी, आयोजक कपिल पवार, नायब तहसिलदार विजय धोत्रे, सम्राट देशमुख, ज्ञानेश चव्हाण, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, अक्षय तोडमल, गौरव पितळे, राहुल पवार, रमेश सुपेकर, अरुण नाणेकर, संदीप पवार, उमेश ठाणगे, गौतम शिंगवी, अजय कविटकर, दिलीप पवार, प्रशांत अंतेपेलू,, सोमनाथ नजान, निखील पवार , सागर बनसोडे अदीसह क्रिकेट प्रेमी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की जिल्ह्यामध्ये नामवंत खेळाडू म्हणून कै.बाळासाहेब पवार यांची ओळख होती नगर जिल्ह्यासह शहरातील क्रिकेट खेळाडू साठी इलेव्हन संघाची स्थापना केली. त्यानंतर क्रॉम्प्टन क्रिकेट करंडक सुरू केला आणि त्या माध्यमातून खेळाडूंना आपल्या खेळाचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यामुळे स्पर्धेचा दर्जा उंचविला आहे. त्यातून चांगले खेळाडू निर्माण झाले कपिल पवार हा देखील चांगला खेळाडू असून त्यांनी आपल्या वडिलांच्या नावाने क्रिकेटचे विचार पुढे घेऊन जाण्याचे काम करत आहे. वाडिया पार्क फक्त नावाला क्रीडा संकुल होते आता या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाचे मैदान निर्माण होणार आहे.पहिल्या टप्प्यात टर्फ विकेट व फल्र्ड लाईट चे काम मार्गी लागणार आहे. त्यामुळे या ठिकाणी संध्याकाळी क्रिकेटचे सामने खेळता येतील त्यातून नगरकर ही आनंद घेईल शहरात कधीही न झालेली कामे सुरू आहेत. सारसनगर परिसरामध्ये स्पोर्ट कॉम्प्लेक्स चे काम अंतिम टप्प्यात आले आहे याचबरोबर सावेडी उपनगरामधील गंगा उद्यान परिसरात खेळाची मैदाने निर्माण होत आहे. आता विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच क्रीडा स्पर्धेमध्ये करिअर करण्याची संधी उपलब्ध असून आपल्या आवडीच्या खेळामध्ये करिअर करावे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वच विषयामध्ये काम सुरू असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

क्रिकेट खेळाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन गेल्या ८ वर्षांपासून करत आहे. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील खेळाडू खेळत असून यावर्षी १२, १४, १६, १९ वर्षाखालील वयोगटातील ५०० खेळाडूंनी भाग घेतला होता ही स्पर्धा पिंक लेदर बॉल वर खेळी असून हे सर्व सामने ऑनलाईन कोरिंग वर दाखवले असल्यामुळे सुमारे ४५ हजार नागरिकांनी खेळाचा आनंद घेतला असल्याची माहिती निखील पवार यांनी दिली.

## मौलाना आझाद गर्ल्स हायस्कूलच्या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन

### चांगल्या खेळाडूमध्ये निर्णय घेण्याची क्षमता,नेतृत्व क्षमता असते - प्रा. डॉ. सलाम सर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** क्रीडा स्पर्धेला प्रोत्साहन दिले पाहिजे. चांगल्या खेळाडूमध्ये निर्णय घेण्याची क्षमता, नेतृत्व क्षमता असते. यासोबतच भावनिक विकासही होतो. त्यामुळे खेळात सहभागी व्हायला हवे.व स्पर्धेमध्ये शिस्त दाखवा, स्वतःमध्ये सांघिक भावना विकसित करा असे मार्गदर्शन मोहंमदीया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ.प्रा. अब्दुस सलाम सर यांनी विद्यार्थीनींना केले.

मोहम्मदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या मौलाना आझाद उर्दू गर्ल हायस्कूलच्या क्रीडा स्पर्धांचे उद्धाटन हवेत फुगे सोडून संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ. प्रा. सलाम सर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संस्थेचे अजीज जनाब, नसीर शेख, सलीम भाई, अलाऊद्दीन सर, हसीब शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन अनेक खेळांच्या स्पर्धेत भाग घेतला. व पारितोषिके प्राप्त करून स्पर्धेचा आनंद घेतला. यशस्वी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात मुख्याध्यापिका फरहाना सय्यद, बहार अंजूम, नाजेमा इकबाल, नाहीद, रफत, नाजेमा जुल्फेकार, अंजुम खान, अफशा, मिनाज शेख, खुतेजा बाजी, सदफ, मलेका बाजी, सिदरा, यास्मिन शेख आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भरपूर परिश्रम घेतले.

## सेंट थॉमस शाळेची स्थापना; शिक्षण क्षेत्रातील नवा आदर्श

### सेंट थॉमस शाळेत ॲथलेटिक मीट २०२४ स्पर्धा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-**अहमदनगर कॉलेजच्या ८० वर्षांची समृद्ध परंपरेचा वारसा पुढे नेणारी आणि बी.पी. एच.ई. सोसायटीच्या चौथ्या शाखेचा गौरव असलेली सेंट थॉमस शाळा मागीलवर्षी स्थापन झाली आहे. प्रयोगशील व बंधनमुक्त शिक्षणपद्धतींवर भर देणारी ही शाळा विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर विविध कौशल्यांचे भांडारही प्रदान करत आहे. सेंट थॉमस शाळेचे नेतृत्व प्रखर नेतृत्व असणाऱ्या श्रीमती नैना नासीर या मुख्याध्यापिका यांच्या हाती आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व ज्ञानवर्धक शिक्षणाचा ध्यास घेतला आहे.

सेंट थॉमस शाळेत ॲथलेटिक मीट २०२४ स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांनीही उत्साहाने सहभाग घेतला, ज्यामुळे शाळेच्या क्रीडा व कुटुंबभावनेला अधिक बळकटी मिळाली. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक असे बक्षीस देण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य श्रीमती नैना नासीर म्हणाल्या की, शाळा अहमदनगर कॉलेजच्या हिरव्यागार आणि रम्य परिसराचा एक भाग आहे. अहमदनगर कॉलेजच्या आधुनिक व पारंपरिक पायाभूत सुविधांनी सेंट थॉमस शाळेला भक्कम आधार मिळाला आहे. बी.पी.एच.ई. सोसायटीच्या संस्थापक बी.पी. हिवाळे आणि त्यानंतरच्या प्राचार्य थॉमस बर्नाबास, प्राचार्य जोसेफ बर्नाबास आणि प्राचार्य डॉ. आर.जे. बर्नाबास यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दिलेले योगदान आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. शाळेची स्थापना बी.पी. एच.ई. सोसायटीच्या आठ दशकांच्या शिक्षणक्षेत्रातील समृद्ध परंपरेचा विस्तार आहे. या परंपरेला पुढे नेण्याचे कार्य डॉ. आर. जे. बर्नाबास (प्राचार्य) आणि श्री. विशाल बर्नाबास (सचिव) यांच्या कुशल नेतृत्वाने आणि पाठिंब्याने शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणारी सेंट थॉमस शाळा, पारंपरिक शिक्षणाचे मोल राखत, आधुनिक तंत्रज्ञान व प्रयोगशीलतेचा अवलंब करत आहे. अहमदनगरमधील शिक्षण क्षेत्रात ही शाळा नवा आदर्श निर्माण करेल, अशी खात्री व्यक्त होत आहे.

स्पर्धा यशस्वीतेसाठी सौ.पूनम नारंग, कु.शेरीन अग्रवाल, सुश्री आशिता, अक्षय भगवाने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचाल अलिना अग्रमाल व कु.शेरीन यांनी केले. आभार आशिता यांनी मानले.

## श्री मार्कंडे मंदिराला ऐतिहासिक ओळख - आ. संग्राम जगताप

### नव वर्षाच्या मुहूर्तावर श्री मार्कंडे मंदिर बांधकाम जीर्णोद्धार कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगतापयांच्या हस्ते संपन्न होणार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** गांधी मैदान येथील श्री मार्कंडे मंदिराला ऐतिहासिक ओळख असून ते भाविकांचे एक श्रद्धास्थान आहे. पद्मशाली समाजाने मंदिराचा जुर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला असून ते पूर्ण झाल्यानंतर शहराच्या वैभवात भर पडेल त्या माध्यमातून धार्मिकता वाढीसाठी मदत होईल श्री मार्कंडे मंदिर देवस्थान ट्रस्टने घेतलेला निर्णय कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

गांधी मैदान येथे श्री मार्कंडे मंदिर देवस्थान ट्रस्टने जुर्णोद्धार बांधकाम भूमिपूजन कामाचे निमंत्रण आमदार संग्राम जगताप यांना दिले. यावेळी अध्यक्ष श्रीकांत छिंदम, उपाध्यक्ष मनोज दुल्लम, सचिव प्रकाश कोटा, पद्मशाळी विद्या प्रसारक मंडळाचे संचालक विनायक गुडेवार, शंकर येमुल, बालाजी मंदिर चे अध्यक्ष विनोद म्याना, महेश सब्बन, बालाजी गोणे, अमोल बोल्ली, महेंद्र यनगुल, विजय सामलेटी, कुणाल घूरुगुल, सागर येमुल आदि उपस्थित होते

गांधी मैदान येथील श्री मार्कंडे मंदिर जीर्णोद्धार बांधकाम कामाचे भूमिपूजन नव वर्षाच्या शुभ मुहूर्तावर दि.१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न होणार असून त्यांना निमंत्रण देण्यात आले आहे तसेच देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार संग्राम जगताप तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिक्याने निवडून आल्याबद्दल त्यांचासत्कार करण्यात आला आहे श्री मार्कंडे मंदिराचे बाधकाम भव्य दिव्य होणार आहे अशी माहिती अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी दिली.

## पीर हजरत दावल मलिक न्यायप्रविष्ट जागेमध्ये गाळे अतिक्रमण धारकांवर कार्यवाहीची ट्रस्टची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** कर्जत मधील गट नं अनुक्रमे ७४६, ७४८, ७४९, ७५०,७५१, ७५२, ७५३, ७५४, ७५५, ७५६, ७५७ हि जागा पीर हजरत दावल मलिक, कर्जत वक्फ बोर्ड मध्ये नोंद झालेली असून नोंदणी क्रमांक एमएसबीडब्ल्यू /एडीआर/४९८/ २०१९ असा क्रमांक आहे. पीर हाजरत दावल मलिकची जागा वाचवण्यासाठी तोसिफ शेख यांचे २० डिसेंबर २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यलया समोर आत्मदहन केले. त्यावेळेस गट नंबर ७५७ मध्ये अतिक्रमण केलेले गाळे पाडण्यात आले. मात्र या कामी एक तोसीफ शेख यांचा निष्पाप जीव गेला.

२८ डिसेंबर २०२४ रोजी या गट नंबर ७५७ मध्ये पुन्हा गाळे धारकांनी बंटी यादव, अप्पा काळे व इतर रा. बहिरोबावाडी ता. कर्जत. वेळ दुपारी सोमनाथ जगताप यांच्या जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. सदर जागी पीर हजरत दावल मलिकचे ट्रस्टी त्या ठिकाणी तत्काळ गेले असता शिवीगाळ, दमदाटी, करून अंगावर धावून येतात.व आमच्याकडे या जागेची नोटरी आहे.

या जागेचे आम्ही मालक आहे. व आम्ही इथे गाळे बांधणारच असे सज्जड दम आम्हाला देतात. ट्रस्टीनी त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला कि हि जमीन वक्फ बोर्ड मध्ये नोंद झालेली आहे. आपण सातबारा काढून बघावा.तरी प्रशासकीय सुट्टीचा कालावधी बघून हे लोक हे काम करत आहेत.

ही माहीती ट्रस्टी यांनी सय्यद वहाब यांना दिलि. सुट्टी असताना हे अतिक्रमण थांबावे या करिता सय्यद वहाब यांनी तातडीने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कर्जत प्रांत, पोलीस निरीक्षक यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करुन सदरची कार्यवाही थांबविण्यासाठी प्रशासनाची मदत घेतली.

यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही ना केल्यास पुन्हा पुनरावृत्ती करावयाची वृत्ती दिसत आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ उचित कार्यवाही करावी व संबंधित इसमांवर गुन्हा दाखल करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी सय्यद वहाब यांच्या सह विश्वासत मंडळाने जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा पोलीस अधिक्षक, कर्जत उप विभागाचे अधिकारी, प्रांत,तहसीलदार कर्जत, पोलीस उपअधिक्षक कर्जत, पोलीस निरीक्षक कर्जत, वक्फ कार्यालय अहिल्यानगर, महाराष्ट्र वक्फ बोर्ड संभाजीनगर यांना निवेदनाद्वारे माजिद इस्माईल पठाण, रज्जाक मुनीरखां झारेकरी, समशेर मिठूभाई शेख,अमीन रशीद झारेकरी, सुफीयान मुश्ताक सय्यद,युनुस दस्तगीर कुरेशी,शरीफ अकबर पठाण, शकील लियाकत अतार आदिंनी केली आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर - ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक - विजय शामराव सांगळे, सहसंपादक- तुकाराम कामठे, कार्यकारी संपादक - जयश्री विजय सांगळे मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Co-editor- Tukaram Kamate, Executive Editor- Jayshri Vijay Sangale Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## निवडक

### आजपासून राज्य रस्ता सुरक्षा अभियानाचा प्रारंभ

अहिल्यानगर - रस्ते अपघात कमी करण्यासाठी तसेच रहदारीच्या नियमांबाबत जनतेमध्ये जागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. यावर्षीही महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्त कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या संपूर्ण महिन्याभरात ''काळजी'' ही थीम / संकल्पना वापरून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येणारअसल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली. जिल्हा पोलीस दल, आरोग्य, शिक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने तसेच जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली याबाबतचे नियोजन लवकरच करण्यात येणार आहे. रस्ता सुरक्षा संदर्भात प्रसार माध्यमातून व्यापक प्रसिद्धी करण्यात येणार असून याकरिता स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांना देखील सहभागी करून घेण्यात येणार आहे.

### गरजूंना आधार देण्याचे इंगळे प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी - रणशेवरे



अहिल्यानगर- सामाजिक भावनेने इंगळे प्रतिष्ठानचे कार्य सुरु आहे. विविध धार्मिक सण-उत्सवात विविध उपक्रम राबवून आपली संस्कृती जोपासण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून केले जात आहे. इतर धर्मियांच्या सण-उत्सवात सहभागी होवून प्रतिष्ठानच्या माध्यमातून धार्मिक ऐक्याचे दर्शन देखील घडत आहे. विविध सामाजिक उपक्रमातून गरजूंना आधार देण्याचे इंगळे प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे यांनी केले. शहरात सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या इंगळे प्रतिष्ठानच्या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे अनावरण तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे व अशोकभाऊ इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकी इंगळे, संजय इंगळे, पप्पू पाटील, राजेंद्र इंगळे, किशोर सोनवणे, कृष्णा इंगळे, राहुल बत्तीन, निलेश खंडेलवाल, सचिन चव्हाण, सुनील भोसले, निखिल उगले, सादिक शेख, अक्षय रसाळ, मतीन शेख, संतोष आडागळे, निखिल कोल्हे, प्रवीण कांबळे, गणेश शिंपी, तेजस भिंगारे, आकाश सरोदे, जय इंगळे, प्रथमेश दुस्सा आदींसह इंगळे प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकी इंगळे म्हणाले की, दरवर्षी प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिनदर्शिका छापून त्याचे मोफत घरोघरी, दुकाने व कार्यालयात वाटप केले जाते. प्रतिष्ठानचे सुरु असलेले सामाजिक कार्याची माहिती व छायाचित्र देखील या दिनदर्शिकेत प्रकाशित करण्यात आलेले आहे. सामाजिक कार्यातून सर्वसामान्य कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती या प्रतिष्ठानशी जोडला गेला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### डोंगरे बहुद्देशीय संस्थेला राष्ट्रपिता महात्मा गांधी लोकसेवा पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर- सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उत्कृष्ट काम करणाऱ्या नगर जिल्ह्यातील स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेला आदिलशाह फारुकी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय लोकसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जळगाव (अडावद, ता. चोपडा) येथील जिल्हाधिकारी कार्यालय, अल्पबचत भवन मध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात पाचोराचे माजी आमदार दिलीप वाघ यांच्या हस्ते डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना पुरस्कार देण्यात आला. यावेळी फारुक शेख, हकीम चौधरी, समिना शेख, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष फारुख शाह नौमानी, उपाध्यक्ष डॉ. जावेद शेख, सचिव जुबेर शाह, कल्पना दबडे आदी उपस्थित होते. स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था नगर तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध कार्यक्रम घेऊन संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी मोठी जनजागृती केली आहे.

# महाराष्ट्र बालक मंदिर शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

## बालवाडी विभागाच्या चिमुकल्यांनी विविध गाण्यावर नृत्य करत जिंकली पालकांची मने

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माणसाच्या जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर त्यांचा पाया पक्का झाला पाहीजे त्या उदेदशाने महाराष्ट्र बालक मंदिरमध्ये शिकवले जाते. सर्व महिला शिक्षिका विदयार्थ्यांची मुलासारखी काळजी घेउन शिकवतात विदयार्थ्याबरोबरच शिक्षक व पालकांचा सिंहाचा वाटा आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सातत्याने संस्था प्रयत्न करते मनमोकळा श्वास व आनंद घेण्याकरीता हे स्नेहसंमेलन असते यातुन तुमच्या सुप्त गुणांना वाव मिळतो. आम्हा संस्थाचालकांसाठी महाराष्ट्र बालक मंदिर ही प्राथमिक शाळा म्हणजे भूषण आहे ही शाळा चांगली मुले घडवते. त्यामुळे तुम्ही खूप मोठे व्हा, अभ्यास करा असे प्रतिपादन अ. जि. म. वि. प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.



लालटाकी रोडवरील अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक समाजाचे महाराष्ट्र बालक मंदिर शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे अ. जि. म. वि. प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी जि. प. चे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील हे होते. सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, सिताराम खिलारी, संस्थेचे सदस्य व शालेय समितीचे अर्जुनराव पोकळे, सदस्या अरूणा काळे, मुख्याध्यापिका अर्चना गिरी, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे , नूतन मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता जाधव , शिक्षक प्रतिनिधी आशा कराळे , विद्यार्थी प्रतिनिधी कु. प्राची गटकळ , आयान शेख आदी उपस्थित होते.

भास्कर पाटील म्हणाले प्रत्येकाच्या जीवनात काहीतरी नैपुण्य येते नवनवीन पाहायला मिळते तो तसा तसा घडत जातो प्राथमिक वयात विदयार्थी जे जे शिकतील ते आयुष्यभर चिरकाल टिकतं असे मानसशास्त्र सांगते संस्थेने या शाळेला जी भौतिक सुविधा पुरवली आहे त्यामुळे या शिक्षकांनाही चांगले काम करण्याची संधी मिळाली आहे. ज्याला बक्षीस मिळाले त्याने आनंदाने हुरळून न जाता आणखी पुढचे बक्षीस मिळवण्याकरीता प्रयत्न करायचा जोपर्यत तुम्ही काही ठरवत नाही तोपर्यत आपल्याला कोणती गोष्ट मिळत नाही म्हणून प्रत्येक विदयार्थ्याने स्वप्न पाहायला शिकले पाहीजे. शिक्षण अधिकारी होण्याचे स्वप्न पाहीले ते पूण केले.जे आपण आयुष्यात ठरवल ते केले पाहीजे त्याकरीता प्रयत्न,धडपड केली पाहीजे प्रत्येक मुलांत उपजत गुण, उर्जा घडवण्याचे पुण्याचे काम शिक्षक करत आहे.

जयंत वाघ म्हणाले या शाळेचा इतिहास सांगायचे म्हटले तर दिवसेदिवस या शाळेचा आलेख उंचावत चालला आहे.यांचा संस्थाचालकांना अभिमान आहे. शिक्षकांनी या शाळेचे नावं मोठं करण्याचे काम केले. दिवसेदिवस मागणी वाढत आहे महाराष्ट्र बालक मंदिर शाळेचे नावं जिल्हयाभर आहे.प्रत्येक क्षेत्रात विदयार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

अर्जुनराव पोकळे आदीनी यावेळी मनोगत व्यक्त करून मुलांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व शाळेचा अहवाल वाचन मुख्याध्यापिका अर्चना गिरी यांनी केले. सूत्रसंचालन सुनिता शेवाळे यांनी केले तसेच बक्षीसवितरण समारंभाचे सुत्रसंचालन स्मिता म्हस्के यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी आशा कराळे यांनी मानले.

प्रथमत सकाळी बालवाडी विभागाचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमाचे उदघाटन अ. जि. म. वि. प्रसारक समाजाच्या शाळा समिती सदस्या कल्पना वायकर, डॉ. सौ. सुमा वाघ, सौ अलका मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. बालवाडी विभागाचे चिमुकल्यांनी विविध गाण्यावर नृत्य सादर करत सर्वांची मने जिंकली. बालवाडी विभाग प्रमुख सौ लता मोढवे, डॉ. धनजंय वाघ, पत्रकार नवनाथ खराडे, ओंकारनगर शाळेचे मुख्याध्यापक भाउसाहेब कबाडी,सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालवाडी, प्राथमिकचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परीश्रम घेतले.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत निवड झाल्याबद्दल पै. चैतन्य शेळके व पै. ऋषिकेश लांडे यांचा सत्कार



## जिल्ह्याचे करणार प्रतिनिधित्व । शक्ती उपासनेचा खेळ आजच्या युवा पिढीसाठी आवश्यक – प्रा. भगवान काटे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताबाच्या स्पर्धेसाठी नगर शहरातील नाना पाटील वस्ताद तालीमचे मल्ल पै. चैतन्य शेळके व पै. ऋषिकेश लांडे यांची निवड झाल्याबद्दल नगर–कल्याण रोड व नालेगाव परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पै. मिलिंद जपे, पै. अशोक घोडके, नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, सचिव पै. बाळासाहेब भापकर, विजय गाडळकर, पै. काका शेळके, प्रा. भगवान काटे, राजाराम रोहकले, बाबासाहेब आंधळे आदी उपस्थित होते.

प्रा. भगवान काटे म्हणाले की, महाराष्ट्रात कुस्ती क्षेत्राला मोठी परंपरा आहे. या मातीने जगाला कुस्ती हा खेळ दिला असून, अनेक मल्ल या मातीतून घडले आहेत. प्राचीन काळापासून भारतात हा खेळ खेळला जातो. शक्ती उपासनेचा खेळ आजच्या युवा पिढीसाठी आवश्यक बनला आहे. व्यसनाच्या आहारी जाणाऱ्या युवकांनी या खेळाकडे वळण्याची गरज आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करुन युवकांना व्यायामाकडे वळण्याचे आवाहन केले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, लोपपावत चाललेला कुस्ती खेळ टिकवण्याचे काम युवा मल्ल करत आहे. शहरासह जिल्ह्यातून अनेक युवा खेळाडू पुढे येत असून, त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. पैलवान शेळके व लांडे हे शहराचे भूषण असून, त्यांनी कुस्ती खेळातून नाव उंचावले आहे. शहरातील अनेक कुस्तीपटूंनी राज्यात आपला दबदबा निर्माण केल्याचा इतिहास असल्याचे त्यांनी सांगितले.

बाळू भापकर यांनी कुस्ती खेळात यशासाठी सातत्य व कष्ट करण्याची तयारी महत्त्वाची असते. सरावाने मल्ल तयार होत असतो. शहरातून महाराष्ट्र केसरी घडविण्याचे स्वप्न साकारले जाण्यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरु आहे. मल्लांनी आपले ध्येय समोर ठेवून वाटचाल करावी. शहराला कुस्ती खेळाचा मोठा वारसा असून, सर्व कुस्तीप्रेमीचे मल्ल घडविण्यास योगदान मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताबाच्या स्पर्धेसाठी नगर जिल्ह्याची निवड चाचणी स्पर्धा सरला बेट येथे नुकतीच पार पडली. या निवड चाचणीत माती विभाग ७० किलो वजन गटात पै. चैतन्य शेळके व गादी विभाग ९२ किलो वजन गटात पै. ऋषिकेश लांडे यांची निवड करण्यात आली आहे. पुढील महिन्यात नगर शहरात होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताबाच्या स्पर्धेत दोन्ही मल्ल नगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. दोन्ही मल्ल शहरातील पै. नाना पाटील वस्ताद तालीम येथे पै. अनिल म्हस्के वस्ताद यांच्या मार्गदर्शनाखालीचे सराव करत आहे. या निवडीबद्दल दोन्ही मल्लांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने

# नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत ही प्रथा नवीन पिढीला दिशादर्शक – आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नवीन वर्षाचे स्वागत आ. संग्राम जगताप यांचे हस्ते जेष्ठ अभिनेते श्रेणीक शिंगवी अध्यक्ष .शशिकांत नजान,अनंत रिसे,स्वप्नील मुनोत,शेखर वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत नटराज पूजन करून करण्यात आले.

या वेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की नाटक हे सामाजिक प्रश्न मांडण्याचे प्रभावी माध्यम आहे.नाटक फक्त मनोरंजनच करीत नाही तर विविध विषयांवर ,सामाजिक प्रश्नांवर भाष्य करून जनजागृती करण्याचे काम रंगभूमीच्या माध्यमातून करते.अहिल्यानगर चे कला विश्व अतिशय प्रभावी असून सांस्कृतिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग केले जातात.नवीन वर्षाचे स्वागत प्रत्येकजन आपल्या पद्धतीने करीत असतात पण सातत्याने २६ वर्ष जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत ही प्रथा कौतुकास्पद आहे. नाटक ही जिवंत कला आहे.ही कला सादर करण्यासाठी शहरात अद्यावत नाट्यगृह येत्या काही महिन्यात पूर्ण होणार असून आपल्या शहराची संस्कृतिक श्रीमंती यापुढील काळात मोठी आणि यशस्वी वाटचाल करेल या साठी शहरातील सर्व कलाकारांनी पुढाकार घ्यावा या साठी आपण सर्वोतोपरी सहकार्य करू असे आ..संग्राम जगताप यांनी सांगितले.

जिप्सी प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत नजान म्हणाले की १९९७ ला सुरू झालेली जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत करण्याची प्रथा असून ज्या नाट्य कट्ट्यावर नाटक सुचते, अनेक कलाकृतींचा जन्म ज्या ठिकाणी होतो, नाट्यकर्मींच्या कल्पना मूर्त रूप धारण करतात त्या कट्ट्यावर साधेपणाने कोणताही सत्कार समारंभ न नटराज पूजन करण्याची सुरू झालेली प्रथा नगरच्या नाट्य क्षेत्रातील एक अविभाज्य घटक झाले आहे. या वेळी बोलताना श्रेणीक शिंगवी म्हणाले की जिप्सी प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक कलाकार तंत्रज्ञ तयार झाले,घडले त्यांना नाट्य–चित्रपटात क्षेत्रात मोठी संधी निर्माण झाली. तंत्रशुद्ध कलाकार आणि तंत्रज्ञ घडविणे याच बरोबर नगरच्या सांस्कृतिक क्षेत्रात विविध प्रयोग करणे हे महत्वाचे कार्य या संस्थे मार्फत होत आहे. अनंत रीसे यांनी सूत्रसंचालन केले तर स्वप्नील मुनोत यांनी आभार मानले. यावेळी सर्वश्री विक्रम विरोळे राजेंद्र बोर्डे सचिन पवार उपस्थित होते.

## विजय भालसिंग कोल्हापूरच्या संमेलनात ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रातील निस्वार्थ कार्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना कोल्हापूर येथील आई महालक्ष्मी संमेलनात ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चित्रपट अभिनेते संजय खापरे व उद्योजिका पूनम मोरे यांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संमेलनाचे स्वागत अध्यक्ष व निमंत्रक प्रा.डॉ. बी.एन. खरात, स्वप्नपूर्ती फाउंडेशनचे डॉ. मोहन गोखले आदी उपस्थित होते.

समृद्धी प्रकाशन, स्वप्नपूर्ती फाउंडेशन, जिद्द फाउंडेशन, वेद फाउंडेशन, स्वामी इंटरप्राईजेसच्या संयुक्त विद्यमाने शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे आई महालक्ष्मी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध क्षेत्रात पुरोगामी विचाराने निस्वार्थपणे कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात विजय भालसिंग गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहे. मुळगाव वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बॅंकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे कार्यरत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने योगदान देत आहे. उन्हाळ्यात पशु–पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु–पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहे.

# राळेगणसिद्धी येथील एकनाथ भालेकर व शरद मापारी शिक्षकांनी केला संसदेचा अभ्यास दौरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** देशातील लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी आणि संसदीय कार्यप्रणाली कशी चालते हे समजून घेण्यासाठी राळेगणसिद्धी येथील एकनाथ भालेकर व शरद मापारी या दोन शिक्षकांनी भारतीय संसदेचा नवी दिल्ली येथे जाऊन अभ्यास केला. राळेगणसिद्धीचे सुपुत्र व सध्या नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयात सह संचालक पदावर कार्यरत असलेले डॉ. गणेश पोटे यांच्या विशेष सहकार्यातून व मार्गदर्शनातून या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्यांनी संसदेच्या कामकाजाची माहिती, संसदीय प्रक्रिया, विधेयकांचे सादरीकरण आणि चर्चा कशी होती याबाबत माहिती जाणून घेतली. तसेच भारतीय लोकशाही व्यवस्थेतील संसदचे महत्त्व व इतिहास, लोकसभा आणि राज्यसभा ही दोन्ही सभागृहे, संसदीय ग्रंथालय, सेंट्रल हॉल, जुने संसद भवन आणि संसद संग्रहालय यांना भेट देऊन ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास केला. संसदेतील मार्गदर्शकांनी त्यांना कायदे कसे तयार होतात, संसदेतील प्रश्नोत्तरांचा तास आणि समित्यांचे कार्य याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व पंतप्रधान कार्यालयाचे माजी राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी त्यांना संवाद साधण्याची संधी मिळाली.



यावेळी त्यांनी राष्ट्रपती भवन, राष्ट्रीय वस्तू संग्राहालय, प्रधानमंत्री संग्रहालय, लाल किल्ला, इंडिया गेट, राष्ट्रीय युद्ध स्मारक, परमवीर मेमोरियल, महाराष्ट्र सदन, राजघाट, शक्तिस्थळ, शांतिवन, वीरभूमी, किसान घाट स्मारक, विजय घाट, राष्ट्रीय गांधी संग्रहालय, कुतुब मिनार, लोटस टेम्पल, अक्षरधाम मंदिर, गुरुद्वारा बंगला साहिब, हुमायूं का मकबरा, जामा मज्जिद, दिल्लीतील सरकारी शाळा आदी ठिकाणांना भेट दिली. हा अभ्यास दौरा आमच्यासाठी प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक त्याचबरोबर संसदेच्या कार्यपद्धतीबद्दल आमचे आकलन वाढवणारा होता. दिल्लीतील ऐतिहासिक वारसा, परंपरा आणि आधुनिक भारताच्या प्रगतीचा आढावा घेता आला, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या अभ्यास दौऱ्यासाठी खासदार निलेश लंके, राष्ट्रपती भवन कार्यालयाचे स्क्काडन लीडर अंकुर नाईक, संसदीय कार्य राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव धीरज सोनजे, संसद सुरक्षा सहायक कमांडट प्रशांत कारंडे, अक्षय पांगरीकर आदींचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**संसदेतील कामकाज कसे चालते हे पाहणे आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणे हा एक प्रेरणादायी अनुभव होता. तसेच हा अभ्यास दौरा म्हणजे केवळ पर्यटन नव्हे, तर ज्ञान, अनुभव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया ठरली.**

**डॉ. गणेश पोटे, सह संचालक, अर्थ मंत्रालय, भारत सरकार.**

**संसदेचा अभ्यास दौरा हा केवळ एक उपक्रम नसून, तो तरुणांना लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रेरित करणारा होता. अशा प्रकारच्या अभ्यास दौऱ्यांमुळे युवकांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि राष्ट्रभक्तीची भावना निर्माण होते.**

**शरद मापारी, शिक्षक**

**संसदेला भेट देणे हा अनुभव आमच्यासाठी खूप प्रेरणादायी ठरला असून, लोकशाही प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा आहे, याची जाणीव झाली. लोकशाही समजून घेतल्याशिवाय तिचे रक्षण करणे शक्य नाही, असा संदेश या अभ्यास दौऱ्यातून आम्हांला मिळाला.**

**-एकनाथ भालेकर, शिक्षक**

# इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या अध्यक्षपदी भारतभूषण भागवत; मानद सचिवपदी डॉ. दीपक विधाते यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहमदनगर स्थानिक केंद्राच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध व्हॅल्युअर व चार्टर्ड इंजिनिअर, सल्लागार अभियंता भारतभूषण भागवत यांची तर, मानद सचिव पदी प्राध्यापक डॉ. दीपक विधाते यांची निवड झाली आहे. ही निवड २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी असून दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उभयंतांनी पदाची सूत्रे स्वीकारली.

भारतभूषण भागवत यांत्रिक अभियांत्रिकी पदवीधर असून त्यांनी रीयल इस्टेट मूल्यांकना मध्ये पदव्युत्तर पदवी व वैकल्पिक विवाद निराकरण यंत्रणेची पदविका प्राप्त केली आहे. सुमारे १८ वर्षापासून ते स्थावर मालमत्ता व प्लांट अँड मशीनरी चे रजिस्टर्ड व्हॅल्युअर, प्रत्यक्ष कर मंडल (सीबीडीटी), दिवाळखोरी आणि दिवाळखोरी बोर्ड ऑफ इंडिया (आयबीबीआय) चे नोंदणीकृत मुल्यांकनकर्ता म्हणून कार्यरत आहेत. प्राथमिक आठ वर्षे त्यांनी विविध औद्योगिक कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांवर काम केले. ३६ वर्षे प्रतिष्ठित ब्रँडसच्या स्वदेशी व आयात मशीनरी च्या विपणनाचा, व १२ वर्षे लघू अभियांत्रिकी उद्योग चालवण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. श्री. भारतभूषण भागवत अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संलग्न असून अहमदनगर शाखेचे अध्यक्ष आहेत. २००९-२०११ या काळासाठी ते इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहमदनगर केंद्राच्या मानद सचिव पदी कार्यरत होते.

डॉ. दीपक विधाते २२ वर्षांपासून विठ्ठलराव विखे अभियांत्रिकी महाविद्यालय अहमदनगर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून इन्फॉर्मेशन टेक्नॉलजी विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. त्यांचे प्रतिष्ठित देशी व विदेशी नियतकालिंकामध्ये ४० हून अधिक शोध निबंध प्रसिद्ध झाले असून चार पुस्तके व पाच इंडियन पेटंट्स त्यांच्या नावावर प्रसिद्ध झाली आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अभ्यासमंडळाचे सदस्य म्हणूनही ते काम पाहत आहेत. डॉ. दीपक विधाते यांनी यापूर्वीही इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहमदनगर केंद्राच्या कार्यकारिणीवर काम केले असून मानद सहसचिव म्हणूनही ते कार्यरत होते.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), या केंद्रीय संस्थेची देश व विदेशामध्ये १२५ हून अधिक केंद्रे आहेत. चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळा, औद्योगिक भेटी, इ. उपक्रमांद्वारे वेगवेगळ्या शाखांमधील अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संस्था प्रयत्नशील असते व अभियांत्रिकी क्षेत्रात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाला सहकार्य व मार्गदर्शन करते. संस्थेच्या अहमदनगर केंद्रामध्ये ११०० कार्पोरेट व २३०० हून अधिक विद्यार्थी सभासद आहेत. संस्थेद्वारे अभियांत्रिकी विद्यार्थी व सभासदांसाठी विविध उपक्रम राबवले जातात.

नगर-कल्याण रोडवर संस्थेच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. केंद्र शासनाच्या प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियानांतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी संस्थेला शासनाकडून परवानगी मिळाली आहे. कौशल्य विकास केंद्र पूर्ण क्षमतेने चालवणे व इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे यासाठी आपले प्राधान्य असून काम पूर्ण होण्यासाठी सभासदांनी आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन त्यांनी केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचे मावळते अध्यक्ष श्री. मनोहर अणेकर यांनी आपल्या तीन वर्षांच्या कार्यकाळाचा लेखाजोखा सादर केला. अत्यंत कठीण परिस्थितीतही सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या इमारतीचे बांधकाम, प्रायोजित बक्षीस योजना, व कौशल्य विकास केंद्र इ योजना कार्यान्वित केल्याचे, तसेच आर्थिक दृष्ट्या संस्था सक्षम करण्याचे प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले. मावळते मानद सचिव श्री. अभय राजे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी अध्यक्ष श्री. प्रकाश गांधी, अविनाश कुलकर्णी, माजी मानद सचिव सर्वश्री मधुकर बालटे, राजकुमार मुनोत, हरिश्चंद्र थिगळे, रामनाथ वायकर, तसेच डॉ. दादासाहेब करंजुले, जी. सी. मोटगी, गिरीश धोत्रे, बाबासाहेब खरबस, प्रदीप तांदळे, उदित हिरे, अंसार शेख आदि सभासद उपस्थित होते.

# फूड फेस्टिव्हलच्या माध्यमातून नगरची खाद्य संस्कृती पुढे घेऊन जाण्याचं काम : आ.संग्राम जगताप

## 'फूडीज् मेला सिझन २' फूड फेस्टिव्हलचे ३ जानेवारीला शहरात आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर मधील खवय्यांसाठी नगर बदलतंय आणि सकल राजस्थानी युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील सर्वात मोठ्या फूड फेस्टिव्हल 'फूडीज् मेला सिझन २' चे आयोजन येत्या ३ ते ५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. सर्व नागरिकांना या खवय्येगिरीचा आनंद घेता येणार आहे. पेमराज सारडा महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर आयोजित या भव्य व सर्वात मोठ्या फूड फेस्टिव्हलच्या मंडपाचे भूमिपूजन आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

यावेळी आ.संग्राम जगताप म्हणाले, आपलं नगर जेवढं ऐतिहासिक स्थळांसाठी प्रसिद्ध आहे तेवढंच विविध प्रकारच्या चविष्ट पदार्थांसाठीही राज्यात प्रसिद्ध आहे. अशा सर्व पदार्थांचा एकाच ठकाणी नगरकरांना आस्वाद घेण्याची मेजवानी नगर बदलतंय आणि सकल राजस्थानी युवा मंचने फूड फेस्टीव्हलच्या माध्यमातून उपलब्ध केली आहे. खाद्य संस्कृती पुढे घेऊन जाण्याचं काम आयोजकांकडून होत आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. नव्या वर्षाची सुरवात या मेजवानीने नगरकरांनी करावी, असे आवाहन आ.जगताप यांनी केले आहे.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष अॅड. अनंत फडणीस, सारडा महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, आर्टिस्ट किरण गवते, धनेश खत्ती, धनेश कोठारी, भूषण ओस्तवाल, कपील शहा, मनोज चोपडा, अभिषेक शेलार, संदेश मुनोत, क्षितिज झावरे, विठ्ठल उरमुडे आदी उपस्थित होते.

# प्रोफेसर कॉलनी चौक, सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने मध्यरात्री नववर्षाचे स्वागत नटराज पूजनाने

## सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने नववर्षाचे हे अनोखे स्वागत तरुणांना दिशा दर्शक- डॉ.सौ.सुधा कांकरिया



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृती ही जगात महान संस्कृती म्हणून ओळखली जाते. त्यामुळे आपल्या संस्कृतीचे संरक्षण करणे गरजेचे आहे. थर्टीफस्टला घांगडधिंगाना घालून समाजात उपद्रव निर्माण करण्यापेक्षा काही विधायक कामे केली तर ती समाजासाठी व येणार्या पिढीसाठी आदर्शवत ठरतील. त्यामुळे युवकांनी अशाच विधायक कामात आपला वेळ घालविला पाहिजे. युवा शक्तीने आपली बुद्धमत्ता, ताकदीचा उपयोग हा देशाच्या विकासासाठी केला पाहिजे. सरत्या वर्षात नगरमधील कलाकारांनी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमातून चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे आगामी वर्ष हे बालिका वर्ष म्हणून साजरे करूया तसेच अहिल्यानगर कलाकारांसाठी उज्वल राहील. सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने नववर्षाचे हे अनोखे स्वागत तरुणांना दिशा दर्शक असे आहे, असे प्रतिपादन डॉ.सुधा कांकरिया यांनी केले.

नववर्षाचे स्वागत प्रोफेसर कॉलनी चौक येथे सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने मध्यरात्री १२ वा. नटराज पुजन करुन करण्यात आले. याप्रसंगी शिल्पकार प्रमोद कांबळे , डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, पवन नाईक,प्रतिष्ठानचे अध्यक्ष विराज मुनोत तेजस अतितकर, संकेत होशिंग, अनंत जोशी, सदानंद भणगे ,भूपेंद्र रासने ,पूनम रासने , संदीप दंडवते ,प्रशांत जठार ,ऍड सतीशचंद्र सुद्रिक ,सुजाता पायमोडे ,सरिता पटवर्धन ,संदीप भुसे ,सुधीर कुलकर्णी ,अभय गोले ,विनय मुनोत ,गौरी सुद्रिक, बालकलाकार ध्वज मुनोत आदि उपस्थित होते.

याप्रसंगी बाल कलाकार ध्वज मुनोत याने आपल्या वाणीतून उपस्थित मान्यवरांना अतिशय मौलिक असे विचार प्रकट केले . त्यामध्ये त्याने सर्वच बाबतीत सद्य परिस्थितीवर असे उदा देऊन वाहवा मिळवली , सध्याच्या युवकांना विशेष सल्ला दिला . ३१ डिसेंबर तर जणू गोल्डन डे झालाय. वर्षभरात ज्या मार्गाने आपण जात नाही, त्या मार्गाने मित्रांच्या संगतीने आणि आग्रहाने जातो आणि आपल्या जीवनाचे नुकसान करुन घेतो. देशाच्या विकासात युवकांचे मोठे योगदान असते. तेव्हा युवकांनी देश हित लक्षात घेऊन आपले आचारण ठेवले पाहिजे. युवकांनी देशाप्रती आपली कर्तव्य भावना जागृत ठेवून आपण करत असलेल्या कार्यातून देशसेवेचे व्रत जपले पाहिजे. देशाची पुढील पिढी सक्षम व सुदृढ बनविण्यासाठी सर्वांनी एक होऊन कार्य करावे असे ध्वज मुनोत याने सांगितले.

यावेळी अध्यक्ष विराज मुनोत म्हणाले, प्रतिष्ठानच्यावतीने गेल्या १६ वर्षापासून ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री नववर्षाचे स्वागत हे नटराज पूजनाने करण्यात येत असते. त्यामुळे नववर्षाचे स्वागत सकारात्मक गोष्टींनी व्हावे, युवकांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी लागावी, त्याच्या कला-गुणांना वाव मिळवा, हा या मागील उद्देश आहे. सक्षम प्रतिष्ठानच्यावतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम हाती घेण्यात येत असतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी तेजस अतितकर म्हणाले, प्रतिष्ठानच्या माध्यमातून वृक्षारोपण, रक्तदान दान, आरोग्य शिबीर, नाट्य प्रशिक्षण व विविध स्पर्धांच्या माध्यमातून मुलांना स्टेज उपलब्ध करुन देण्यात येत असते. यापुढेही असेच उपक्रम सुरु राहतील, असे सांगितले.

गौरी सुद्रिक यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित पोवाडा सादर केला .

यावेळी सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे कलाकार यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला यामध्ये संजोग धोत्रे ,अवनती गोले ,सिद्धी कुलकर्णी ,पवन नाईक ,तसेच देखावा व रिकामिक एकांकिकांचे संघ ,फुलपाखरू बालनाट्य संघ राजश्री भणगे आदींचा सन्मान करण्यात आला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कटिबद्ध होत पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी - आ. विक्रम पाचपुते

## अहिल्यानगर शहर भाजप सभासद नोंदणी कार्यशाळा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** एक काळ असा होता भाजपचा एकही आमदार जिल्ह्यात नव्हता. परंतु आज चित्र पूर्णपणे बदलले आहे. या यशाचे सर्व श्रेय फक्त पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच जाते. पक्षाच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने व कार्यकर्त्याने विधानसभा निवडणूकीत भाजपच्या उमेदवाराला बळ देत निष्ठेने काम केल्यानेच जिल्ह्यात महायुतीला मोठे यश मिळाले आहे. आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागणार आहेत. यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व सर्व कार्यकर्त्यांनी कटीबद्ध होत तयारीला लागावे. प्रवाह बरोबर अनेकजण पक्षात येत असतात. जो कोणी येईल त्यासाठी दारे उघडे आहेत परंतु जो पक्ष निष्ठेने काम करतो त्यालाच संधी मिळाली पाहिजे. अहिल्यानगर शहरात २९७ बुथ आहेत. प्रत्येक बुथवर दोनशे सभासदाप्रमाणे सदस्य नोंदणी केल्यास जवळपास ६० हजार सदस्य नोंदणी अपेक्षित आहे. त्यापेक्षा जास्त सभासद नोंदणी करून उच्चांक करून दाखवू. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हात आपण बळकट करूया, असे प्रतिपादन श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी केले.

अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या सुरु असलेल्या सदस्य नोंदणी अभियाना अंतर्गत आयोजित पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे उद्घाटन आ.विक्रम पाचपुते यांनी महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने केले. पेमराज सारडा महाविद्यालायात झालेल्या या कार्यशाळेस शहर जिल्हाध्यक्ष अॅड अभय आगरकर, सरचिटणीस सचिन पारखी व प्रशांत मुथा, प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा.भानुदास बेरड, ज्येष्ठ नेते सुनील रामदासी, वसंत लोढा, अनिल मोहिते, महेश नामदे, दामोदर बठेजा, पंडित वाघमारे, मयूर बोचूघोळ, माजी महापौर बाळासाहेब वाकळे, बाबासाहेब सानप, अशोक गायकवाड, नितीन शेलार, राहुल जामगावकर, सुरेंद्र गांधी, बाळासाहेब गायकवाड, संजय ढोणे, धनंजय जाधव, महेश तवले, अजय चितळे, साहिल शेख, नरेंद्र कुलकर्णी, बंटी डापसे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

आ.पाचपुते पुढे म्हणाले, सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाची आज भारतातच नव्हे तर जगात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. सर्व सामान्य कार्यकर्ता हीच खरी पक्षाची ताकद असते. त्यांची ताकद मिळाल्यामुळे भाजपचे आज ओळख आहे .तळागाळातील कार्यकर्ता मोठा व्हायला पाहिजे जो पक्षनिष्ठेने काम करतो त्याला ताकद मिळाला पाहिजे हा मूळ उद्देश सभासद नोंदणीचा आहे. पक्षाला अजून पाठबळ देण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन केले.

शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर म्हणाले, कोणत्याही पक्षाला सत्ता टिकवायची असेल तर त्याचे संघटन बांधणी मजबूत असावी लागते. शहरात पक्षाची मोठी ताकद आहे. प्रत्येकाने जास्तीत जास्त सभासद नोंदणी स्वबळावर करावी. महाराष्ट्र हा सभासद नोंदीमध्ये देशात अग्रेसर राहील अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. त्यांना आपल्याला पाठबळ देयचे आहे. यासाठी सर्व बूथ प्रमुखांनी प्रत्येक घरोघरी जाऊन हे अभियान राबवावे.

याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, वसंत लोढा, प्रा.भानुदास बेरड, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, विवेक नाईक आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गायकवाड यांनी केले तर आभार महेश नामदे यांनी मानले.

# जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रामनाथ वाघ यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आणि देशाचे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे पाईक आणि त्यांच्या नावाने स्थापन केलेल्या व्यासपीठचे संस्थापक अध्यक्ष रामनाथ वाघ यांची पाचवी पुण्यतिथी साजरी झाली. दिनांक १ जानेवारी रोजी त्यानिमित्त त्यांच्या बुरुडगाव रोडवरील रायगड निवासस्थानी प्रतिमा पूजन झाले.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे आणि लखनऊ विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ चे अध्यक्ष डॉ.सर्जेराव निमसे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. यावेळी यशवंतराव चव्हाण व्यासपीठचे उपाध्यक्ष, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सहसचिव, सुपुत्र काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त मुकेश मुळे, न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य तांबे, प्रा.पोपटराव काळे, प्रा.एल बी म्हस्के न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अरुण गांगर्डे, डॉ. धनंजय वाघ, डॉ. सागर वाघ, संगीता वाघ, डॉ.सुमा वाघ, डॉ. मृणाल वाघ डॉ. कृतिका वाघ आणि परिवारातील सदस्य आदी उपस्थित होते. त्यांचे पाचवे पुण्यस्मरण करताना कुलगुरू निमसे म्हणाले की, नगर मधील राजकीय सामाजिक शैक्षणिक उल्लेखनीय असे काम रामनाथ वाघ यांचे आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करताना १९७२ च्या दुष्काळात त्यांनी नगर जिल्ह्यात २०० पाझर तलाव आणि नालाबंडिंग करून विक्रम केला. त्यावेळी साडेचार लाख लोकांना रोजगार हमीचे काम त्यांनी उपलब्ध करून दिले. या कर्तुत्वाची दखल घेऊन त्यांना तत्कालीन मुख्यमंत्री यांनी विशेष पुरस्कार देऊन गौरविले. गोरगरीब घटकाला न्याय देण्यासाठी त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा परिषद आणि अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या माध्यमातून त्यांनी भरीव असे काम केले. अनेकांचे संसार उभे केले. वांबोरी येथे मोठा निधी दिला. विकास कामात हातभार देऊन विविध संस्था उभ्या केल्या. वांबोरी उपसा जल सिंचन योजना कार्यान्वित करून त्यांनी दहा हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणले. वाघ परिवार त्यांचेच सामाजिक कार्य पुढे नेत आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून चव्हाण आणि वाघ यांचे विचार आणि कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न आपण करत आहोत.

(पान १ वरून)

## नगर अर्बन बँकेतील 'ते'लॉकर्स उघडण्याचा बँक प्रशासनाचा निर्णय

शाखेतील लॉकरमध्ये ठेवण्यात येणार आहेत. तसेच थकीत लॉकरचे भाडे संबंधित लॉकरधारक अथवा त्यांचे वारस यांचेकडून किंवा मुद्देमालाचा लिलाव करून वसूल करण्यात येणार आहे. या लॉकरधारकांची यादी बँकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.nucb.in वर प्रकाशित करण्यात आलेली असून लॉकरधारकांनी तात्काळ संबंधित शाखेची अथवा बँक प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

## कवाडे यांच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार- सुरेश बनसोडे

न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश भाऊ बनसोडे, पी आर पी जिल्हा अध्यक्ष सुमेध गायकवाड यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी सिद्धार्थ राजगुरू, अनिकेत विधाते, राज्य उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, कपिल लिंगायत आदी उपस्थित होते.
यावेळी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या लघुउद्योग मंडळाच्या उपाध्यक्षपदी जयदीप जोगेंद्र कवाडे यांची निवड झाल्याबद्दल सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व आमदार संग्राम जगताप मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला व शौर्य दिनाच्या शुभेच्छा देऊन येथून पुढे कवाडे यांच्या माध्यमातून अनेक बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार असल्याची भावना व्यक्त केली.

### अहमदनगर पहिली मंडळी, सी. एन. आय हातमपुरा येथील

# चर्चमध्ये ख्रिस्तजन्मोत्सव सप्ताह कार्यक्रम अंतर्गत नववर्षाचे भक्ती उपासनाने स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आज १ जानेवारी २०२५ रोजी नुतन वर्षानिमीत्त चर्चमध्ये विशेष भक्तीचे नियोजन केले गेले. नुतन वर्ष तसेच प्रभु येशूचे नामकरण दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. चर्चचे धर्मगुरु यांनी उपस्थित भक्तगणांना नुतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

आपल्या प्रवचानातून परमेश्वरांने पुन्हा एक नविन वर्ष आपल्याला दाखविले आहे म्हणून त्या सर्वसमर्थ परमेश्वराचे आपण आभार मानिले पाहिजे. या नविन वर्षामध्ये संकल्प करतांना त्या सर्वसमर्थ परमेश्वराला समोर ठेवून बायबलमधील शिकवणीनुसार आपले आचरण शुध्द आणि पवित्र असायला हवे जेणेकरुन या भुतलावर प्रभु येशूचे दुसरे आगमन होईल त्या दिवशी आपण त्याच्यासमोर उभे राहण्यास लायक ठरु अन्यथा नरकाच्या भयंकर यातनांपासून आपली सुटका नाही असे रेव्ह. तुपसुंदरे पाळकसाहेब आपल्या प्रवचानातून म्हटले.

चर्चमधील भक्ती झाल्यानंतर सभासदांनी एकमेकांना नुतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह अभिजीत तुपसुदरे, सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, रविंद्र लोंढे सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, शोभना गायकवाड, वंदना शिंदे, कांदबरी सुर्यवंशी, शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे हया कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले तसेच कौतुकास्पद परिश्रम चर्चचा तरुण संघाने घेतले महिला मंडळ, चर्च सभासद हयांचे मोलाचे सहकार्य लाभले.